निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
शुक्रवार
०६ फेब्रुवारी २०२६
पाने: ०४ किंमत: २.००
वर्ष: १५ वे अंक: ३४१ वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे


# महागर्जनेसाठी सज्ज!

## मुंबईत रंगणार जागतिक दर्जाची 'पल्स' वैद्यकीय परिषद; 'महाराष्ट्र ब्रँड' जागतिक नकाशावर कोरण्याचे मुख्यमंत्र्यांचे आदेश

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** महाराष्ट्राला जागतिक 'मेडिकल हब' बनवण्यासाठी राज्य सरकारने कंबर कसली आहे. २७ आणि २८ मार्च २०२६ रोजी मुंबईतील 'जिओ वर्ल्ड सेंटर' येथे 'पल्स' (PULSE) या भव्य वैद्यकीय परिषदेचे आयोजन करण्यात येणार आहे. या परिषदेच्या माध्यमातून केवळ उपचारच नव्हे, तर 'वेलनेस' पर्यटनाचा 'महाराष्ट्र ब्रँड' जगभरात प्रस्थापित करण्याचा निर्धार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

वर्षा निवासस्थानी पार पडलेल्या उच्चस्तरीय आढावा बैठकीत मुख्यमंत्र्यांनी या परिषदेच्या आयोजनाबाबत अत्यंत आक्रमक आणि स्पष्ट दिशादर्शने दिली.

मुख्यमंत्र्यांचे 'व्हिजन २०२६': काय आहेत महत्त्वाचे निर्देश?

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या परिषदेला केवळ एक कार्यक्रम न मानता, राज्याच्या अर्थव्यवस्थेला आणि आरोग्य व्यवस्थेला कलाटणी देणारी संधी मानले आहे. त्यांचे प्रमुख मुद्दे खालीलप्रमाणे:

वेलनेस पर्यटनाचा धमाका: पारंपारिक आणि खर्चिक उपचारांच्या पलीकडे जाऊन जगाचा कल आता 'वेलनेस'कडे आहे.

महाराष्ट्रात आयुष (AYUSH) आणि निसर्गोपचाराची मोठी ताकद आहे. या शक्तीला व्यावसायिक रूप देऊन राज्याला जागतिक पर्यटनाचे केंद्र बनवा.

स्टार्टअप्सना बळ, कॅन्सरवर मात: वैद्यकीय क्षेत्रातील स्टार्टअप्सना या परिषदेत मोठे व्यासपीठ द्या. त्यांच्या संशोधनातून कॅन्सरसारख्या जीवघेण्या आजारांवर स्वस्त आणि सुलभ उपचार पद्धती विकसित व्हावी, हा मुख्य उद्देश असावा.

गुंतवणुकीचा महापूर: जागतिक गुंतवणूकदारांना आकर्षित करून महाराष्ट्रातील 'बल्क ड्रग पार्क' मध्ये मोठी गुंतवणूक आणण्यासाठी ही परिषद 'पिच' म्हणून वापरा.

नोडल अधिकार्यांची नियुक्ती: परिषदेच्या सूक्ष्म नियोजनासाठी प्रत्येक संबंधित विभागाने तातडीने नोडल अधिकारी नियुक्त करण्याचे आदेश त्यांनी दिले आहेत.



### 'पल्स' परिषदेची वैशिष्ट्ये: काय असेल खास?

ही परिषद वैद्यकीय क्षेत्रातील एक 'महासंगम' ठरणार आहे. त्याचे स्वरूप खालीलप्रमाणे असेल:

१.जागतिक उपस्थिती: २९०० हून अधिक तज्ज्ञ, जागतिक आरोग्य संघटना (WHO) आणि युनेस्कोचे (UNESCO) उच्चपदस्थ अधिकारी सहभागी होणार.

२. तंत्रज्ञानाचा आविष्कार: भविष्यातील वैद्यकीय शिक्षण, डिजिटल हेल्थ आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) यावर विशेष पॅनल चर्चा आणि कार्यशाळा.

३.भव्य दालने: ३६० डिग्री डोम, स्टार्टअप्ससाठी स्वतंत्र विभाग आणि नवनवीन वैद्यकीय उपकरणांचे प्रदर्शन.

४. बौद्धिक देवाणघेवाण: जगातील नामवंत विद्यापीठांचे कुलगुरू आणि संशोधक 'टेक टॉक' आणि केस स्टडीजच्या माध्यमातून संवाद साधणार.

**ग्रामीण आरोग्य आणि मानसिक स्वास्थ्यावर भर**

या बैठकीला उपस्थित असलेल्या वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी ग्रामीण भागाच्या सक्षमीकरणावर जोर दिला.

या परिषदेत केवळ चर्चा न होता प्रत्यक्ष करार (MoUs) व्हावेत, जेणेकरून ग्रामीण भागात आधुनिक आरोग्य सुविधा पोहचतील. तसेच, वाढत्या मानसिक आजारांवरील नवनवीन उपचार पद्धतींवरही या परिषदेत विशेष लक्ष दिले जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

**प्रशासकीय यंत्रणा कामाला!**

या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी एमएमआरडीए आयुक्त डॉ. संजय मुखर्जी, पर्यटन सचिव संजय खंदारे, माहिती व जनसंपर्क महासंचालक ब्रिजेश सिंह यांच्यासह अनेक वरिष्ठ सनदी अधिकारी नियोजनात सक्रिय झाले आहेत.

थोडक्यात सांगायचे तर, 'पल्स' परिषदेच्या माध्यमातून महाराष्ट्र आता वैद्यकीय क्षेत्रात केवळ सेवा देणारे राज्य न राहता, जगाला दिशा देणारे 'नॉलेज आणि वेलनेस सेंटर' बनण्याच्या दिशेने झेप घेत आहे.

# विकसित भारत २०४७ च्या दिशेने पाऊल

## पुण्यात 'पीएम-सेतू' योजनेवर महत्त्वपूर्ण उद्योग चर्चासत्र संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**पुणे/प्रतिनिधी/**केंद्र सरकारच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयातर्फे (MSDE) 'विकसित भारत २०४७' हे स्वप्न साकार करण्यासाठी 'पीएम-सेतू' (PM-SETU) योजनेच्या अंमलबजावणीसाठी पुण्यात एका विशेष उद्योग चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. 'यशवंतराव चव्हाण अकादमी ऑफ डेव्हलपमेंट ॲडमिनिस्ट्रेशन' (यशदा) येथे पार पडलेल्या या कार्यक्रमात देशातील तरुणांना अधिक कुशल आणि रोजगारक्षम बनविण्यावर सखोल चर्चा करण्यात आली.

या चर्चासत्राला केंद्रीय कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाच्या सचिव देबाश्री मुखर्जी आणि महाराष्ट्र राज्याच्या कौशल्य विकास विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा यांची प्रमुख उपस्थिती होती. या दौऱ्यादरम्यान मान्यवरांनी आयटीआय औंध (पुणे), फ्रोनियस इंडिया प्रा. लि. (भोसरी) आणि लाइटहाऊस (निगडी) येथील प्रकल्पांना भेटी देऊन तिथल्या कामकाजाची पाहणी केली.

पीएम-सेतू: आयटीआयचे कायापालट करणारी योजना

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या संचालक माधवी सरदेशमुख यांनी पीएम-सेतू योजनेचे सादरीकरण केले. या योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत:

बजेट: ऑक्टोबर २०२५ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या या योजनेसाठी ५ वर्षांत **६०,००० कोटी रुपयांची भरीव तरतूद करण्यात आली आहे.

उद्देश: आयटीआयमधील पायाभूत सुविधांचा दर्जा सुधारणे, बदलत्या काळानुसार नवीन अभ्यासक्रम सुरू करणे आणि उद्योग-नेतृत्वाखालील प्रशासन (Industry-led Governance) राबवणे.

मॉडेल:यामध्ये 'हब-अँड-स्पोक' मॉडेल आणि 'विशेष उद्देश वाहने' (SPV) यांच्या माध्यमातून प्रशिक्षण दिले जाणार आहे.

उद्योगांचा सहभाग आणि फायदे

या चर्चासत्रात ऑटोमोटिव्ह, बांधकाम, वस्त्रोद्योग, एफएमसीजी, इलेक्ट्रॉनिक्स आणि नवीकरणीय ऊर्जा यांसारख्या विविध क्षेत्रांतील ३६ मोठ्या कंपन्यांनी सहभाग नोंदवला. उद्योग प्रतिनिधींनी या योजनेमुळे होणाऱ्या फायद्यांवर प्रकाश टाकला:

१.कुशल मनुष्यबळ: उद्योगांना थेट कामासाठी तयार (गेल-शिरवू) असलेल्या प्रशिक्षणार्थ्यांची उपलब्धता होईल.

२.अद्ययावत तंत्रज्ञान: आधुनिक प्रयोगशाळा आणि प्रगत उपकरणांचा वापर करण्याची संधी मिळेल.

३.उत्पादन केंद्रे: आयटीआयचा वापर केवळ प्रशिक्षण केंद्र म्हणून न करता 'उत्पादन आणि नवोन्मेष केंद्रे' म्हणून करता येईल.

४.सीएसआर सरेखन: कंपन्यांना त्यांच्या सीएसआर (CSR) आणि ईएसजी (ESG) उपक्रमांना या योजनेशी जोडून सामाजिक योगदान देता येईल.

या कार्यक्रमाला कौशल्य विकास मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव निरंजन कुमार सुधांशू, आयुक्त डॉ. अमित सैनी, आरडीएसडीईचे संचालक एस. मूर्ती चेगोंडी, नवी दिल्लीचे उपसंचालक दिव्यांशू आणि उद्योग क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# स्वरसम्राज्ञीला सुरांजली: 'पु.ल. कट्ट्यावर' उद्या रंगणार लतादीदींच्या आठवणींचा जागर

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी**/भारतरत्न लता मंगेशकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या अजरामर गीतांचा आणि आठवणींचा प्रवास अनुभवण्याची सुवर्णसंधी मुंबईकर रसिकांना मिळणार आहे. पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या वतीने 'पु.ल. कट्टा' या उपक्रमांतर्गत शुक्रवार, ६ फेब्रुवारी २०२६ रोजी विशेष सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

हा कार्यक्रम केवळ गाण्यांपुरता मर्यादित नसून, तो गानकोकिळेच्या जीवनप्रवासाचा एक पट असणार आहे. कार्यक्रमाची प्रमुख आकर्षणे खालीलप्रमाणे आहेत.अजरामर गीतांचे सादरीकरण: लतादीदींनी गायलेली निवडक लोकप्रिय आणि भावस्पर्शी गीते या मैफलीत सादर केली जातील. दृकश्राव्य सादरीकरण: दीदींच्या अतुलनीय कारकीर्दीवर आधारित मान्यवरांची मनोगते ऑडिओ-व्हिज्युअल माध्यमातून दाखवण्यात येतील.दुर्मीळ आठवणींचा खजिना: ज्येष्ठ संगीत रसिक आणि नौशाद संगीत समितीचे काका जे. पी. हे लतादीदींच्या आयुष्यातील काही अपरिचित आणि दुर्मीळ प्रसंग प्रत्यक्ष रसिकांसमोर उलगडणार आहेत.

**वेळ आणि ठिकाण**

दिनांक: शुक्रवार, ६ फेब्रुवारी २०२६,वेळ: सायंकाळी ६:०० वाजता,स्थळ: पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीचे प्रांगण, खुला रंगमंच, प्रभादेवी, मुंबई.

**प्रवेश विनामूल्य:** हा कार्यक्रम सर्व संगीतप्रेमी आणि सर्वसामान्य जनतेसाठी पूर्णपणे विनामूल्य आहे.

पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीने सर्व कलाप्रेमींना या 'सुरांची मेजवानी' अनुभवण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. दीदींच्या दैवी सुरांचा वारसा पुन्हा एकदा अनुभवण्यासाठी आणि त्यांना आदरांजली वाहण्यासाठी हा एक उत्तम मंच ठरणार आहे.

# राज्य लॉटरीच्या जानेवारी महिन्यातील भव्यतम, मासिक व साप्ताहिक सोडतीचा निकाल जाहीर

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** महाराष्ट्र राज्य लॉटरीतर्फे प्रत्येक महिन्यात ५ मासिक व ६ भव्यतम सोडती तसेच साप्ताहिक सोडती काढल्या जातात. जानेवारी २०२६ मध्ये महाराष्ट्र नाताळ नवीन भव्यतम सोडत, महाराष्ट्र सहयाद्री, महाराष्ट्र गणेश लक्ष्मी मकर संक्रांत विशेष, महाराष्ट्र गौरव, महाराष्ट्र तेजस्विनी व महाराष्ट्र गजराज या मासिक सोडती काढण्यात आल्याचे उपसंचालक (वित्त व लेखा), महाराष्ट्र राज्य लॉटरी, वाशी यांनी प्रसिद्धीपत्राद्वारे कळविले आहे.

महाराष्ट्र राज्य लॉटरी

द. ७ जानेवारी २०२६ रोजी महाराष्ट्र नाताळ नवीन वर्ष भव्यतम या सोडतीमधून NYA ०५/२८८४ या महावीर लॉटरी सेंटर, कोल्हापूर व NYA ०७/४०८० या श्री. सिद्धी समर्थ एजन्सी, दादर यांचेकडून विक्री झालेल्या तिकिटास रक्कम रु.२५ लाखाचे प्रथम क्रमांकाचे दोन बक्षिस जाहीर झाली आहेत. दिनांक २१ जानेवारी २०२६ रोजी महाराष्ट्र गौरव या मासिक सोडतीमधून G-18/0879 या डायमंड कॉर्पोरेशन, बोरिवली यांचेकडून विक्री झालेल्या तिकिटास रक्कम रु.२७ लाखाचे प्रथम क्रमांकाचे बक्षिस जाहीर झाले आहे.दिनांक २३ जानेवारी २०२६ रोजी महाराष्ट्र तेजस्विनी या मासिक सोडतीमधून TJ-03/9661 या रॉयल एजन्सी, आंकली यांचेकडून विक्री झालेल्या तिकिटास रक्कम रु.२१ लाखाचे प्रथम क्रमांकाचे बक्षिस दुसरे बक्षिस रू. २ लाखाचे जैनी एजन्सी, घाटकोपर यांचेकडून जाहीर झाले आहे.

तसेच महा. सागरलक्ष्मी ते महाराष्ट्रलक्ष्मी या साप्ताहिक सोडतीमधून रक्कम रू. ७ लाखाचे प्रथम क्रमांकाचे एकूण ५ बक्षिसे जाहीर झाली आहेत.

याशिवाय जानेवारी-२०२६ मध्ये मासिक व भव्यतम सोडतीतून १२८८२ तिकीटांना रू. १,५६,६७,२००/- व साप्ताहिक सोडतीतून ५५,५४३/- तिकीटांना रू १,५८,५९,१००/- ची बक्षिसे जाहीर झाली आहेत. सर्व खरेदीदारांनी महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या वेबसाईटवर नमूद प्रक्रिया पूर्ण करून रक्कम रू. १०,०००/- वरील बक्षिसाची मागणी उपसंचालक (वित्त व लेखा), महाराष्ट्र राज्य लॉटरी, वाशी या कार्यालयाकडे सादर करावी. रक्कम रू. १००००/- च्या आतील बक्षिस रकमेची मागणी विक्रेत्यांकडून करण्यात यावी, असे उपसंचालक (वित्त व लेखा), महाराष्ट्र राज्य लॉटरी, वाशी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# २५ वर्षांनंतर ऐतिहासिक पाऊल: नवी दिल्लीत राज्य निवडणूक आयुक्तांची राष्ट्रीय परिषद

**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली/प्रतिनिधी**/निवडणूक प्रक्रियेत सुसूत्रता आणण्यासाठी आणि केंद्र व राज्य निवडणूक आयोगांमधील समन्वय वाढवण्यासाठी एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. भारत निवडणूक आयोगाच्या (ECI) वतीने २४ फेब्रुवारी २०२६ रोजी नवी दिल्लीतील प्रतिष्ठित भारत मंडपम येथे राज्य निवडणूक आयुक्तांची (SECs) राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली आहे.

विशेष बाब म्हणजे, तब्बल २५ वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर अशा प्रकारची परिषद होत आहे. यापूर्वी १९९९ मध्ये ही परिषद पार पडली होती.

या परिषदेचे अध्यक्षस्थान मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार भूषवणार आहेत. त्यांच्यासोबत निवडणूक आयुक्त डॉ. सुखबीर सिंग संधू आणि डॉ. विवेक जोशी यांची प्रमुख उपस्थिती असेल. या परिषदेत देशातील सर्व ३६ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांचे राज्य निवडणूक आयुक्त, त्यांचे कायदेशीर व तांत्रिक तज्ज्ञ आणि मुख्य निवडणूक अधिकारी (CEO) सहभागी होणार आहेत.


परिषदेची मुख्य उद्दिष्टे आणि चर्चासत्रे

या परिषदेचा मुख्य हेतू निवडणूक व्यवस्थापनात 'सिनर्जी' (Synergy) म्हणजेच समन्वय निर्माण करणे हा आहे. खालील महत्त्वाच्या विषयांवर या परिषदेत मंथन होईल:

**डिजिटल क्रांती:** आयोगाने सुरू केलेल्या एउखछएढ या डिजिटल प्लॅटफॉर्मचा प्रभावी वापर आणि तांत्रिक नवकल्पनांवर चर्चा.

**मतदार याद्या:** ७३ व्या व ७४ व्या घटनादुरुस्तीनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या (पंचायत व नगरपालिका) निवडणुकांसाठी अचूक मतदार याद्या तयार करण्याबाबत मार्गदर्शन.

**एतच् तंत्रज्ञान:** ईव्हीएम संदर्भातील तांत्रिक बाबी आणि निवडणूक संचालन.




**अनुभव देवाणघेवाण:** भारत निवडणूक आयोग आपला प्रदीर्घ अनुभव राज्य निवडणूक आयोगांसोबत सामायिक करेल, जेणेकरून स्थानिक पातळीवरील निवडणुका अधिक पारदर्शक आणि कार्यक्षम होतील.

**राज्य निवडणूक आयोगाची भूमिका**

संविधानातील ७३ व्या आणि ७४ व्या घटनादुरुस्तीनुसार, प्रत्येक राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. पंचायत राज संस्था आणि नगरपालिकांच्या निवडणुकांचे संचालन, नियंत्रण आणि मतदार याद्या तयार करण्याची महत्त्वाची जबाबदारी या आयोगांवर असते.

ही परिषद केंद्र आणि राज्य या दोन्ही स्तरांवरील निवडणूक यंत्रणांना एकाच व्यासपीठावर आणून लोकशाहीची पाळेमुळे अधिक घट्ट करण्यासाठी मैलाचा दगड ठरणार आहे.

# स्व. अजितदादा पवार यांच्या अस्थींचे शहागड येथील गोदावरी पात्रात विसर्जन; कार्यकर्त्यांचा जनसागर लोटला

**आत्ताच एक्सप्रेस**

**शहागड /प्रतिनिधी/** राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांचा अस्थिकलश बुधवारी शहागड येथील पवित्र गोदावरी नदीच्या पात्रात विसर्जित करण्यात आला. लाडक्या नेत्याला अखेरचा निरोप देताना उपस्थित शेकडो कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांना अश्रू अनावर झाले होते. 'अजितदादा अमर रहे'च्या घोषणांनी गोदावरीचा तीर दुमदुमून गेला होता.



**अंत्यदर्शनासाठी जनसागराची गर्दी**

स्व. अजितदादा पवार यांचा अस्थिकलश मागील तीन दिवसांपासून जालना जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यालयात अंतिम दर्शनासाठी ठेवण्यात आला होता. बुधवारी दुपारी १२ वाजता हा अस्थिकलश रथ जिल्हा कार्यालयातून शहागडकडे मार्गस्थ झाला. शहरातील मस्तगड, गांधी चमन, शनी मंदिर चौक, नूतन वसाहत, लहुजी चौक, स्व. मदर तेरेसा चौक आणि अंबड चौफुली या मार्गावरून जात असताना हजारो नागरिकांनी रस्त्याच्या दुतर्फा उभे राहून अस्थिकलशाचे दर्शन घेतले.

**ग्रामीण भागातूनही भावपूर्ण निरोप**

अस्थिकलश रथ अंबड रोडने शहागडकडे जात असताना इंदेवाडी, अंतरवाला, गोलापांगरी, शेवगा फाटा, पारनेर, अंबड, शहापूर, धाकलगाव आणि वडीगोद्री येथील ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली होती. ठिकठिकाणी पुष्पवृष्टी करून लाडक्या नेत्याला श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. सायंकाळी ५ वाजता हा रथ शहागड येथे पोहोचला.

**नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना फुटला अश्रूंचा बांध**

शहागड येथे अस्थी विसर्जन विधी पार पडत असताना जिल्हाध्यक्ष माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांना दुःख अनावर झाले आणि त्यांच्या अश्रूंचा बांध फुटला. त्यांना पाहून उपस्थित शेकडो कार्यकर्तेही भावूक झाले. गोदावरीच्या पात्रात अस्थींचे विसर्जन करून सर्वांनी जड अंतःकरणाने आपल्या नेत्याला श्रद्धांजली वाहिली.

या प्रसंगी राजकीय क्षेत्रातील दिग्गज नेत्यांची उपस्थिती होती, ज्यात प्रामुख्याने आमदार हिकमत उढाण, माजी मंत्री राजेश टोपे, माजी आमदार शिवाजीराव चोथे, माजी आमदार सुरेशकुमार जेथलिया.प्रदेश उपाध्यक्ष मधुकरराव आर्दड, शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, शहर जिल्हाध्यक्ष शेख मेहमूद, महिला नेत्या शकुंतलाताई कदम, पुष्पाताई चव्हाण, वंदना खांडेभराड, शितल बारोटे, पदाधिकारी: रवींद्र तौर, महेंद्र पवार, जयमंगल जाधव, चंद्रकांत कारके, प्रा. सोपानराव तेलगड, अण्णासाहेब चितेकर, मिर्झा अन्वर बेग, केशव जंजाळ, लक्ष्मण दळवी आणि इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या विसर्जन कार्यक्रमाने संपूर्ण जालना जिल्ह्यात आणि विशेषतः राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये शोककळा पसरली असून, एका कर्तृत्ववान नेतृत्वाची अखेरची यात्रा शहागड येथे संपन्न झाली.

# मालेगावचा महासंग्राम: तत्त्व बाजूला, आता फक्त सत्तेचा खेळ!

मालेगाव महापालिकेच्या सत्तेची चावी सध्या कोणा एकाच्या हातात नाही, तर ती विखुरलेल्या आकड्यांमध्ये अडकली आहे. ७ फेब्रुवारीला होणाऱ्या महापौर निवडीपूर्वी शहरात जे राजकीय 'नाट्य' घडत आहे, ते लोकशाहीच्या नावाखाली चाललेला निव्वळ आकड्यांचा बाजार असल्याची टीका होत आहे.१. एमआयएम आणि दादा भुसे यांची भेट.

नवीन समीकरणाची नांदी?सर्वात मोठा धक्का म्हणजे एमआयएमचे आमदार मुफ्ती इस्माईल आणि गटनेते अब्दुल मलिक यांनी मंत्री दादा भुसे यांची घेतलेली भेट. कट्टर वैचारिक विरोधक असलेले हे दोन पक्ष सत्तेसाठी एकत्र येणार का? हा प्रश्न आता विचारला जात आहे. जर शिवसेनेचे १८ आणि एमआयएमचे २१ नगरसेवक एकत्र आले, तर हा आकडा ३९ पर्यंत पोहोचतो. बहुमतासाठी आवश्यक असलेल्या ४३ च्या आकड्यासाठी त्यांना अजूनही ४ मतांची गरज भासणार आहे.

'नॉट रिचेबल' राजकारण आणि फोडाफोडीची भीतीमहापौर निवडीच्या दोन दिवस आधीच अनेक नगरसेवक 'नॉट रिचेबल' होणे, हे मालेगावच्या राजकारणात काहीतरी 'मोठं' शिजत असल्याचे संकेत आहेत. ३५ जागा जिंकणाऱ्या इस्लाम पार्टीला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी इतर सर्व पक्ष एकत्र येण्याची शक्यता नाकारता येत नाही.३. काँग्रेसची 'किंगमेकर' भूमिकाकेवळ ३ नगरसेवक असूनही काँग्रेस सध्या मालेगावात 'किंगमेकर'च्या भूमिकेत आहे.

भाजप आणि काँग्रेसने एकत्र येऊन 'भारत विकास आघाडी' करण्याचा प्रयत्न केला खरा, पण भाजपने माघार घेतल्याने तो प्रयोग फसला. आता काँग्रेस आपला पाठिंबा 'सेक्युलर फ्रंट'ला (इस्लाम पार्टी + सपा) देते की एमआयएम-शिवसेना युतीला, यावर मालेगावचा पुढचा महापौर ठरेल.पक्षीय बलाबल आणि सत्तेचे गणितपक्षजागाइस्लाम पार्टी ३५ एमआयएम (चखच)२१शिवसेना१८समाजवादी पार्टी ५ काँग्रेस ३ भाजप २ बहुमताचा आकडा ४३ जनतेच्या कौलाचा आदर की सत्तेची लाचारी?मालेगावच्या या राजकीय सर्कशीत जनतेच्या प्रश्नांपेक्षा 'कोणाचा महापौर बसणार' यालाच जास्त महत्त्व दिले जात आहे. वैचारिक विरोधाभास बाजूला सारून जर शिवसेना आणि एमआयएम एकत्र आले, तर तो त्यांच्या कार्यकर्त्यांसाठी मोठा धक्का असेल. मात्र, सत्तेच्या समीकरणामुळे तत्त्वांना तिलांजली देण्याची परंपरा मालेगावात पुन्हा एकदा अधोरेखित होत आहे.

पुढील २४ तास मालेगावच्या राजकारणासाठी अत्यंत निर्णायक आहेत. घोडेबाजार रोखण्यात कोण यशस्वी होतो आणि कोणती 'अदृश्य शक्ती' कोणाला साथ देते, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

# द.म. रेल्वे महाव्यवस्थापकांकडून आदिलाबाद-मुदखेड-पूर्णा विभागाची सविस्तर पाहणी; विकासकामांचा घेतला आढावा

**आत्ताच एक्सप्रेस**
**नांदेड/प्रतिनिधी**/दक्षिण मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक श्री. संजय कुमार श्रीवास्तव यांनी आज, ५ फेब्रुवारी २०२६ रोजी नांदेड विभागातील आदिलाबाद - मुदखेड - पूर्णा या रेल्वे मार्गाची वार्षिक पाहणी केली.

या दौऱ्यात त्यांनी रेल्वे सुरक्षा, प्रवासी सुविधा आणि 'अमृत स्टेशन' योजनेअंतर्गत सुरू असलेल्या विकासकामांवर प्रामुख्याने भर दिला. त्यांच्यासोबत नांदेडचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक प्रदीप लक्ष्मणराव कामले आणि मुख्यालय व विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

महाव्यवस्थापकांनी आपल्या दौऱ्याची सुरुवात आदिलाबाद रेल्वे स्थानकापासून केली. यावेळी त्यांनी खालील बाबींची पाहणी केली.अमृत स्टेशन योजना: स्थानकाच्या पुनर्विकास कामाच्या प्रगतीचा आढावा घेतला.कर्मचारी सुविधा: क्रू लॉबी, एकत्रित क्रू रनिंग रूम आणि धावत्या कर्मचाऱ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या सुविधांची तपासणी केली.



प्रतिनिधींशी चर्चा: आदिलाबादचे आमदार पायल शंकर यांनी महाव्यवस्थापकांची भेट घेऊन क्षेत्रातील प्रलंबित रेल्वे प्रकल्पांवर चर्चा केली. तसेच इतर अनेक लोकप्रतिनिधींनी आपल्या मागण्यांचे निवेदन त्यांना दिले.

सुरक्षा आणि तांत्रिक तपासणी

रेल्वे प्रवासाची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी श्रीवास्तव यांनी मार्गावरील तांत्रिक बाबींची बारकाईने पाहणी केली.लेव्हल क्रॉसिंग गेट (क्र. २३): आदिलाबाद-किनवट दरम्यानच्या गेट बूम, रेकॉर्ड आणि सुरक्षा उपकरणांची कार्यक्षमता तपासली. त्यांनी तेथील चौकीदाराशी संवाद साधून कामाच्या स्वरूपाबद्दल विचारपूस केली.

पूल आणि ट्रॅक: नागरा-नाला येथील पूल क्रमांक ११० ची सविस्तर तपासणी करण्यात आली. तसेच वक्र क्रमांक ४० (Curve No. 40) येथे रेल्वे ट्रॅकची देखभाल आणि सुरक्षेची पाहणी करून त्यांनी गँगमनशी संवाद साधला.किनवट, हिमायतनगर, भोकर आणि मुदखेड या स्थानकांवर महाव्यवस्थापकांनी सविस्तर पाहणी केली.प्रवासी सुविधा: बुकिंग काउंटर, प्रतीक्षालय, स्टेशन मास्टर कार्यालय आणि परिभ्रमण क्षेत्राचा आढावा घेतला.कामांना वेग देण्याचे निर्देश: अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत सुरू असलेली कामे नियोजित वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

विभागीय अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या प्रगती अहवालावर त्यांनी समाधान व्यक्त केले, मात्र काम जलदगतीने करण्यावर भर दिला.

**पूर्णा स्थानक: आपत्कालीन सज्जतेची चाचणी**

दौऱ्याच्या शेवटच्या टप्प्यात महाव्यवस्थापकांनी पूर्णा स्थानकावरील पुनर्विकास कामांची पाहणी केली. विशेष म्हणजे, त्यांनी तेथील वैद्यकीय मदत वाहन (MRV) आणि अपघात मदत ट्रेन (ART) च्या सज्जतेची खात्री केली. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत रेल्वे प्रशासन किती तत्पर आहे, याची त्यांनी पडताळणी केली.

हा दौरा नांदेड विभागातील रेल्वे पायाभूत सुविधांच्या आधुनिकीकरणासाठी आणि प्रवाशांच्या सुरक्षित प्रवासासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

# बाबासाहेब सर्वांचेच?

संविधान बनलं व ते देशाच्या कामी येत आहे. आज संविधानानुसार सर्वच जीवजंतू, वृक्षवल्ली आणि प्राणीमात्राही सुखी झालेले आहेत. त्यातच सुखी झाला आहे मानव. असं हे महत्वपुर्ण संविधान बनवलं, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी आणि त्यात सहा लोकांनी. ज्यात इतर जातीधर्माचीही माणसं होती. पर्याय नसल्यानं त्यावेळेस बाबासाहेबांना घेण्यात आलं व संविधान निर्मीतीची जबाबदारी टाकण्यात आली. ती जबाबदारी बाबासाहेबांनी अगदी समर्थपणे पेलवली. पुढं त्यात राजकारण आलं, नव्हे तर आणलं गेलं व राजकारणानुसार संविधान निर्मितीपासूनच बाबासाहेबांची जात आडवी आली. अप्रत्यक्ष ठरवलं गेलं की पर्याय नसल्यानं आपण आज डॉक्टर बाबासाहेबांकडून संविधान बनवून घेतलं. पुढं काळाच्या ओघात कधीतरी आपण वेगळं संविधान बनवू. अन् ते संविधान अस्पृश्य, आदिवासी नाही तर उच्चभ्रू जातीतील लोकांकडून बनवू.

त्यानंतर बाबासाहेबांना मानण्याची गरज उरणार नाही. हेच विष पसरत गेलं समाजात. ज्यातून संविधान लेखन करतांना इतर समाजाचे व धर्माचे लोकं असले तरी त्यांची नावं जाणीवपुर्वक हटविण्यात आली व त्या संविधानात केवळ एका विशिष्ट जातीचं संविधान म्हणून बाबासाहेबांचंच नाव जोडण्यात आलं. ज्यातून काही लोकं बाबासाहेबांचा ध्वजारोहणाच्या वेळेस फोटो सोडा, साधं नाव घेण्यास तिरस्कार दाखवतात. हेच नाशिकच्या प्रकरणावरुन दिसलं. नाशिकचं ते प्रकरण. प्रजासत्ताक दिनाच्या ध्वजारोहणाप्रसंगी एका नेत्यानं बाबासाहेबाचं नाव घेतलं नाही. त्यावरुन वाद झाला होता.*

बाबासाहेबांबद्दल सांगायचं झाल्यास बाबासाहेबांना लोकांनी एका विशिष्ट जातीत बंदिस्त केलंय. असं दिसतं. त्यांना तसं बंदिस्त करणारा समज विचारात घेतला असता दोन बाजू प्रकर्षाने जाणवतात. एक बाजू म्हणजे त्यांचा समाज. त्यांच्याच समाजानं त्यांना बंदिस्त करुन टाकलंय व दुसरी बाजू म्हणजे इतर समाज. इतर समाजांनेही त्यांना त्यांच्या विशिष्ट जातीत बंदिस्त करुन टाकलंय. हीच वास्तविकता सगळीकडे दिसून येत आहे.

बाबासाहेब....... बाबासाहेब आंबेडकर काही एका विशिष्ट समाजाचे नाहीत. जरी त्यांनी एका विशिष्ट जातीत जन्म घेतला असेल तरी. कारण त्यांनी जे कार्य केले. ते विशिष्ट जातीसाठी, विशिष्ट धर्मासाठी वा विशिष्ट गटासाठी केलेलं नाही, तर ते कार्य सर्व समाजासाठी केलेलं दिसून येतं.

बाबासाहेब आंबेडकरांनी भरपूर कामे केलीत. ज्यात काही विशिष्ट कामं आणि तिही महत्वपुर्ण कामं ठरतात. पहिलं महत्वपुर्ण काम म्हणजे संविधान लेखन. म्हणतात की संविधान लेखन करतांना डॉ. बाबासाहेब हे एकच व्यक्तिमत्त्व नव्हतं तर त्यात अनेक व्यक्तिमत्त्व होते. ज्यातून संविधान निर्माण झालं. ते मसुदा समीतीचे अध्यक्ष असल्यामुळेच त्यांचं नाव झालं. जसा एका शाळेचा मुख्याध्यापक. ती शाळा चालवीत असतांना सर्व शिक्षकांचं सहकार्य लागतं. जर ती शाळा नावारुपाला येत असेल तर त्यात सर्व शिक्षकांच्या सहकार्याचं योगदान असतं. परंतु जेव्हा ती शाळा नावारुपाला येते. तेव्हा मुख्याध्यापकाचं नाव होतं. तेच गणित सर्वजण संविधान निर्मितीतही लावतात व म्हणतात की जर घटना लिहितांना बाकीचे लोकं होते तर त्यांनी काहीच कार्य केले नसेल काय? बरोबर आहे हे म्हणणं व कोणालाही ते म्हणणं बरोबरच वाटेल.

भारत स्वतंत्र होणार होता. संविधान बनविण्यासाठी घटनासमीती बनली. जिचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद होते. त्यानंतर संविधानाचा उद्देश तयार झाला व ती उद्देश सभा ६ डिसेंबर १९४६ ला झाली. त्यात संविधान का निर्माण करायचे आहे. यावर भर देण्यात आला. त्यात सदस्य कोणकोणते घ्यावे, यावर जास्त भर देण्यात आला व संपुर्ण हिंदूस्थानातील लोकांचा समावेश यात करण्यात आला. ज्यात ३८९ सदस्य होते. परंतु जेव्हा फाळणी झाली. त्यानंतर संविधान सभेत २९९ सभासद राहिले. त्यातही ज्यांनी निर्माण झालेल्या मसुद्यावर स्वाक्षऱ्या केल्या. त्यांची संख्या ही २८४ होती. याच संविधान सभेनं नंतर अनेक समीत्या बनवल्या. ज्यात मसुदा समीती अहम होती. त्यात सात सदस्य होते व त्या सात सदस्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अल्लादी कृष्णास्वामी अय्यर, एन गोपालस्वामी अय्यर, के एन मुन्शी, मोहम्मद सादुल्ला, एन माधव राऊ, टी टी कृष्णमाचारी होते. बी एन मित्तर हे आजारी पडल्यानं राजीनामा दिला व त्याजागी एन माधव राऊला घेण्यात आले तर टी टी कृष्णमाचारीला डी पी खेतान मरण पावल्यानंतर घेण्यात आले. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे या मसुदा समीतीचे अध्यक्ष ठरले.

म्हणतात की बाकीचे सात सदस्य हे राजकारणातच सहभागी होते. ज्यातून संविधान बनविण्याची संपूर्ण जबाबदारी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांवर आली होती व ज्याप्रमाणे शाळेतील इतर शिक्षकांनी कामे न केल्यास ती कामं एकट्या मुख्याध्यापकाला करावी लागतात. तेच या ठिकाणी घडलं. परंतु हे जरी खरं असलं तरी बरीचशी कामं इतर सदस्यांनीही केलीत. परंतु डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचं त्यात योगदान जास्त आहे.

घटना ही लवकरच तयार झाली. ज्यात सात सदस्यांचे प्रत्यक्ष योगदान होते व एका व्यक्तीचं अप्रत्यक्ष योगदान होतं. ती म्हणजे सविता आंबेडकर. कारण बाबासाहेब घरी आले की त्यांनाही संविधान सभेत घडलेल्या गोष्टी सांगत असत व तिचा सल्ला घेत असत.

संविधान जेव्हा तयार झालं. त्यावेळेस जाणीवपुर्वक सहा नाव संविधान निर्मितीतून हटविण्यात आलीत. म्हणतात की यात राजकारण झालं. ज्यात कोणी म्हणतात की बाबासाहेबांनीच मेहनत घेतल्यामुळे त्यांचं नाव ठेवण्यात आलं. कोणी म्हणतात जातीभेदातून बाबासाहेबांचं नाव ठेवण्यात आलं. ते काहीही असो, देशाला संविधान मिळालं व एक नवी ताकद मिळाली हे महत्वपुर्ण आहे.

बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान बनवलं. हे काही एका विशिष्ट वर्गातील लोकांसाठी नाही. तमाम सर्वच लोकांसाठी बनवलं. ते बाबासाहेबांच्या अध्यक्षतेखाली बनलं. हे त्यांच्या हातून झालेलं महत्वपुर्ण काम व दुसरं काम म्हणजे धर्मांतरण. त्यांनी बौद्ध धम्म स्विकारला.

संविधान हे लिहिलं गेलं. स्रीयांसाठी, स्री सुरक्षीत असायला हवी. अस्पृश्यांसाठी, अस्पृश्य सुरक्षीत असायला हवे. आदिवासीसाठी, आदिवासी सुरक्षीत असायला हवेत. ओबीसीसाठी, ओबीसी सुरक्षीत असायला हवेत. गरीब व धनिकांसाठी, ते सर्व सुरक्षीत असायला हवेत. सर्वच धर्म व जातीसाठी, ते सर्व सुखी व सुरक्षीत व्हायला हवेत. त्यात हा ब्राह्मण व हा अस्पृश्य असा भेदभाव केल्या गेलेला नाही. ते संविधान मानवतेसाठी लिहिलं गेलेलं आहे. देशातील सर्वच प्रकारचे मानव सुखी व सुरक्षीत असायला हवेत. बनायला हवेत.

त्यातच ते सर्व जीवजंतूसाठी लिहिलं गेलेलं आहे. देशातील सर्व जीवजंतू सुखी व सुरक्षीत असायला हवेत. एवढंच नाही तर ते संविधान झाडांसाठीही लिहिलेलं आहे. आता झाडंही कोणाला कापता येत नाहीत. असे असतांना आज ज्या बाबासाहेबांनी व त्यांच्या चमूंनी संविधान लिहिलं. त्या बाबासाहेबांची लोकं हेळसांड करतात. निरंतर वाद करीत असतात. बाबासाहेबांना डिवचतात ती मंडळी. बाबासाहेब त्यांना नकोसा वाटतो, असं चित्र दिसतं. कारण प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी त्यांचा फोटो नसतो ध्वजारोहणाच्या वेळेस. साधं नावंही नसतं मुखात. काहींना तर बाबासाहेब एवढे अप्रिय दिसतात की ते संविधानानुसारही चालू नये असे इतरांना सांगतात. स्वतः मात्र संविधानानुसार चालतात. त्याचा उपभोग घेतात.

आज देशातील लोकांची अशी स्थिती दिसते की लोकांना डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी बनविलेलं संविधान चालतं, आपला फायदा करुन घेण्यासाठी. परंतु बाबासाहेब चालत नाही. तरी बरं झालं की त्यांनी आपल्या स्वतःचं दैवतीकरण केलेलं नाही. मुर्तीपुजा कालबाह्य ठरवली. माझीच नाही तर इतर देवीदेवतांच्या फोटो ठेवा म्हटलेलं नाही. परंतु उपकाराची जाणीव म्हणून नाव घेण्यावर बंदी घातली नाही. आज आम्ही त्यांचे उपकारच विसरलेलो आहोत. असे उपकार विसरायचं सोडा, उलट त्यांची किळस करतो आम्ही. त्यांनी निर्माण केलेल्या संविधानाचीही किळस करतो आम्ही. संविधान वापरतो, त्याचा उपभोगही घेतो. परंतु ते मनापासून पाळत नाही. कारण तसं पाळत असतांना आमच्या मनात आडवी येते त्यांची जात. काश! बाबासाहेबांनी संविधानात आपल्याच जातींना जास्त प्राधान्य दिलं असतं तर...... तर किती रान माजलं असतं कुणास ठाऊक? परंतु बरं झालं की त्यांनी संपूर्ण समाजासाठी व धर्मासाठी कार्य केलं. संपूर्ण जीव, प्राणीमात्रा व वृक्षवल्लींसाठी कार्य केलं.

विशेष सांगायचं म्हणजे ज्या बाबासाहेबांनी संविधान निर्माण करतांना भेदभाव केलेला नाही. मग असे असतांना आपण आज त्यांच्याबद्दल का भेदभाव करावा. हं, ठीक आहे की प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी बाबासाहेबांचा फोटो नको आहे तर नका ठेवू ध्वजाजवळ. परंतु ज्या बाबासाहेबांनी संविधान बनवलं. त्याचं तोंडाद्वारे थोडंसं तर नाव घ्या, उपकाराची जाणीव म्हणून. ते नाव दररोज घेण्याची गरज नाही. वर्षातून एकदोन वेळा तर घ्या. ज्यांनी देशाला संविधान बनवून महत्वपुर्ण योगदान दिलं. त्या महामानवाला माना. हं, बाबासाहेबांनी सांगीतल्याप्रमाणे दैवतीकरण नका करु. फोटो नका ठेवू. पुजापाठ नका करु, चालेल. परंतु डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना माना, हृदयात ठेवा. त्याचबरोबर मसुदा समीतीतील इतर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सदस्यांनाही हृदयात ठेवा. ज्यांनी संविधान बनवितांना महत्वपुर्ण योगदान दिलंय.

**-अंकुश शिंगाडे नागपूर**

# राष्ट्रवादी विलीनीकरणाच्या चर्चेमुळे राऊत घाबरले; भाजपा प्रवक्ते नवनाथ बन याचा घणाघात

**आत्ताच एक्सप्रेस**
**मुंबई/ प्रतिनिधी/**
अजित पवार यांच्या निधनानंतर राज्यातील राजकारण 'राष्ट्रवादीच्या विलीनीकरणा'भोवती फिरत असतानाच, आता या मुद्द्यावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये शाब्दिक युद्ध रंगले आहे. राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या चर्चेमुळे खासदार संजय राऊत यांच्या पोटात गोळा उठला असून, शरद पवार एनडीएमध्ये जातील या भीतीने त्यांना आता उपरती झाली आहे, अशी तिखट टीका भारतीय जनता पार्टीचे माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन यांनी गुरुवारी केली. भाजपा प्रदेश कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

**राऊतांच्या बदललेल्या भूमिकेवर निशाणा**

अजित पवारांच्या निधनानंतर दोन राष्ट्रवादींच्या विलीनीकरणावर राजकारण करणाऱ्या संजय राऊतांनी आज अचानक हा दोन पक्षांचा अंतर्गत विषय आहे असे विधान केले. यावर बोलताना बन म्हणाले की, संजय राऊतांना आता वास्तवाची जाणीव झाली आहे. शरद पवार महायुतीसोबत जातील या भीतीने त्यांना घाम फुटला आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार विलीनीकरणाबाबत जो निर्णय घेतील, त्याला भाजपाचा पहिल्या दिवसापासून पाठिंबा आहे.

'मविआ' केवळ नावापुरतीच उरली

महाविकास आघाडीच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित करताना नवनाथ बन यांनी नमूद केले की, आज मविआमध्ये नक्की कोण उरले आहे, हाच मोठा प्रश्न आहे. विधानसभा निवडणुकीत मविआची शकले उडाली होती आणि महापालिका निवडणुकीनंतर तर ही आघाडी पूर्णपणे नामशेष झाली आहे. उद्धव ठाकरे आणि संजय राऊतांनी महाराष्ट्राचा विश्वासघात केला आहे, त्यामुळे त्यांना 'विश्वास' हा शब्द उच्चारण्याचा अधिकार नाही.

**विलीनीकरणाचा निर्णय सुनेत्रा पवार घेतील**

संजय राऊतांच्या मोदी-शाहांच्या इच्छेमुळे शरद पवारांना सोबत घेतले जात नाही या टीकेला उत्तर देताना बन यांनी स्पष्ट केले की, शरद पवारांना राष्ट्रवादीत घ्यायचे की नाही, हे पंतप्रधान नरेंद्र मोदी किंवा अमित शाह ठरवणार नाहीत. हा निर्णय राष्ट्रवादीच्या सर्वेसर्वा सुनेत्रा पवार आणि त्यांचे नेते घेतील. ज्यांना दोन भावांना (ठाकरे) एकत्र ठेवता आले नाही, त्यांनी दुसऱ्यांच्या घरात नाक खुपसू नये.

फडणवीस कायद्याचे रक्षक, भ्रष्टाचाऱ्यांचे भक्षक

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर होणाऱ्या टीकेचा समाचार घेताना बन म्हणाले, संजय राऊतांची मुख्यमंत्र्यांवर टीका करण्याची पात्रता नाही. फडणवीस ११ कोटी जनतेच्या आशीर्वादाने कायद्याचे राज्य चालवत आहेत.

उद्धव ठाकरे आणि राऊतांनी वर्षानुवर्षे मुंबई आणि महाराष्ट्राची लूट केली, त्यांना योग्य जागा दाखवण्याचे काम फडणवीस करत आहेत.

**मुंबईत भाजपाचा महापौर हा 'सुवर्णक्षण'**

मुंबई महानगरपालिकेच्या आगामी राजकारणावर भाष्य करताना त्यांनी विश्वास व्यक्त केला की, ज्या दिवशी मुंबईवर महायुतीचा महापौर बसेल, तो दिवस मुंबईसाठी 'सुवर्ण दिन' असेल. गेल्या २५ वर्षांची लूट थांबवून मुंबईला खड्ड्यातून बाहेर काढण्याची ती सुरुवात असेल. मात्र, ठाकरे गटासाठी तो काळा दिवस असेल, कारण जनतेने त्यांना मतरुपी काळे फासले आहे.

# आडुळमध्ये शिंदेसेनेची 'धडक'!

## विकासाच्या झंझावातात विरोधक गारद; जनसंपर्काचा 'मास्टरस्ट्रोक' ठरणार निर्णायक!

**आत्ताच एक्सप्रेस**
**पैठण/विशेष प्रतिनिधी/ शिवाभाऊ दौंड**/ पैठण तालुक्यातील राजकारणाचे केंद्रबिंदू असलेल्या आडुळ जिल्हा परिषद गटात सध्या परिवर्तनाचे वारे वाहत नसून, शिवसेना (एकनाथ शिंदे गट) या पक्षाचा अक्षरशः झंझावात पाहायला मिळत आहे.



गेल्या काही दिवसांपासून या गटात सुरू असलेला जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता, आगामी निवडणुकीत शिंदे गट विरोधकांचा सुपडा साफ करणार, अशीच चिन्हे दिसत आहेत.

**राजकीय समीकरणे आणि विरोधकांची दाणादाण**

आडुळमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस आणि उद्धवसेना (UBT) आपले अस्तित्व टिकवण्यासाठी संघर्ष करताना दिसत आहेत. मात्र, शिंदे गटाने ज्या पद्धतीने वंचित बहुजन आघाडी आणि इतर स्थानिक घटकांशी समन्वय साधला आहे, त्यामुळे विरोधकांच्या गोटात शांतता पसरली आहे.

**विकासाचा 'हायवे': केवळ आश्वासन नाही, तर प्रत्यक्ष कृती!**

आडुळ गटात गेल्या काही वर्षांत विकासाची जी गंगा आली आहे, त्याचे पूर्ण श्रेय शिंदे गटाच्या नेतृत्वाला दिले जात आहे.रस्ते आणि पायाभूत सुविधा: ग्रामीण भागातील रस्ते चकाचक झाले असून दळणवळणाची साधने सुधारली आहेत.पाणीपुरवठा व आरोग्य: 'हर घर नल' पासून ते अद्ययावत आरोग्य केंद्रांपर्यंतची कामे मार्गी लागल्याने सर्वसामान्य जनता सुखावली आहे. आमदार उदय सामंत यांच्या माध्यमातून मिळालेला भरघोस निधी आणि स्थानिक नेत्यांची ती राबवण्याची जिद्द यामुळे आडुळचा कायापालट झाला आहे, अशी भावना स्थानिक मतदार उघडपणे व्यक्त करत आहेत.



जनसंपर्काचा 'किल्ला' अभेद्य; 'ड्रॉईंग रूम' नव्हे तर थेट 'चावडीवर' राजकारण!

निवडणुका जवळ आल्यावर दर्शन देणाऱ्या नेत्यांच्या काळात शिंदे गटाचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी मात्र ३६५ दिवस जनतेच्या दारात उभे आहेत. केळशी असो वा जुईकर मोहल्ला, लोकांच्या सुख-दुखात धावून जाणारा गट म्हणून शिंदेसेनेने आपली प्रतिमा तयार केली आहे.

**थेट संवाद**: लोकांच्या तक्रारी केवळ ऐकून न घेता, त्यावर तात्काळ तोडगा काढण्याची 'कार्यपद्धती' मतदारांच्या मनाला भावली आहे.

**संघटन शक्ती**: कार्यकर्त्यांची फळी इतकी मजबूत आहे की, विरोधकांना प्रचारासाठी जागा शोधणेही कठीण झाले आहे.

महायुतीची ताकद: शिंदे गटाच्या पाठीशी असलेल्या संघटनात्मक एकतेमुळे ही निवडणूक आता केवळ औपचारिकता उरली आहे का? अशी चर्चा चौकाचौकात रंगली आहे.

**विरोधकांचे 'डिपॉझिट' धोक्यात?**

येणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुकीत आडुळ गटातून शिंदे गटाचा विजय हा केवळ काठावरचा नसेल, तर तो विक्रमी मताधिक्याचा असेल, असा अंदाज राजकीय विश्लेषकांनी वर्तवला आहे.ज्यांनी काम केले, त्यांनाच मतदान हा जनतेचा पवित्रा विरोधकांची झोप उडवणारा ठरत आहे.आता केवळ मतदानाच्या तारखेची प्रतीक्षा असून, आडुळवर 'धनुष्यबाणा'चा भगवा फडकणार हे जवळपास निश्चित झाले आहे.

# सिद्धनाथ वाडगाव गणात सत्ताधाऱ्यांना थेट आव्हान!

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर (प्रतिनिधी)** सिद्धनाथ वाडगाव पंचायत समिती गणात आगामी निवडणुकीचे रणशिंग फुंकले गेले असून, येथील राजकीय वातावरण आता पूर्णपणे तापले आहे. या गणातील लढत आता केवळ उमेदवारांमधील लढत राहिलेली नसून, ती सत्तेविरुद्ध जनतेची थेट लढाई बनली आहे. अपक्ष उमेदवार प्रदीप पाटील चव्हाण यांच्या रूपाने सत्ताधाऱ्यांसमोर मोठे आव्हान उभे राहिले असून, त्यांना मिळालेल्या अष्टपैलू पाठिंब्यामुळे प्रस्थापित राजकारण्यांचे धाबे दणाणले आहेत.

**शिवसेना-वंचित-काँग्रेससह शेतकरी व कामगार संघटनांची एकजूट; प्रदीप पाटील चव्हाण यांच्या पाठीशी जनशक्तीचा महासागर**

राजकीय समीकरणे बदलली; विरोधकांची झोप उडाली प्रदीप पाटील चव्हाण यांच्या पाठीशी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गट, वंचित बहुजन आघाडी, काँग्रेस यांसारख्या मोठ्या राजकीय पक्षांसह शेतकरी संघटना आणि कामगार संघटनांनी आपली शक्ती उभी केली आहे. या अभूतपूर्व एकजुटीमुळे गणातील जुनी राजकीय समीकरणे कोलमडून पडली आहेत. सर्वसमावेशक पाठिंबा मिळाल्याने चव्हाण यांची बाजू भक्कम झाली असून, विरोधकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे.

सत्ताधाऱ्यांच्या 'पोलखोल' मोहिमेला मिळतोय प्रचंड प्रतिसाद प्रदीप पाटील चव्हाण यांनी आपल्या प्रचारादरम्यान वर्षानुवर्षे दुर्लक्षित राहिलेले प्रश्न आणि सत्ताधाऱ्यांनी दिलेल्या फसव्या आश्वासनांवर थेट बोट ठेवले आहे. शेतकरी उद्ध्वस्त, कामगार दुर्लक्षित आणि तरुण बेरोजगार - हेच सत्ताधाऱ्यांचे खरे अपयश आहे, असा घणाघाती हल्लाबोल त्यांनी आपल्या सभांमधून केला आहे. विकासकामांच्या नावाखाली झालेली दिरंगाई आणि जनतेच्या प्रश्नांकडे केलेले दुर्लक्ष यावर त्यांनी सडकून टीका केली असून, त्याला सर्वसामान्य नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

गावोगावी बदलाची लाट गावोगावी होणाऱ्या चव्हाण यांच्या सभा आणि पदयात्रांमध्ये नागरिकांची मोठी गर्दी उसळत आहे.

पदयात्रांमध्ये घुमणारे घोषणाबाजीचे सूर आणि महिला-तरुणांचा वाढता उत्साह पाहता सिद्धनाथ वाडगाव गणात बदलाचे वारे वाहत असल्याचे स्पष्ट होत आहे. एक अपक्ष उमेदवार असूनही एवढ्या मोठ्या प्रमाणावर संघटित पाठिंबा मिळवणे, ही सत्ताधाऱ्यांविरोधातील जनक्षोभाची चिन्हे मानली जात आहेत.

**सत्ता टिकणार की जनता बदल घडवणार?**

शिवसेना-वंचित-काँग्रेससह शेतकरी व कामगार संघटनांची ताकद एकत्र आल्यामुळे ही निवडणूक आता ऐतिहासिक वळणावर आली आहे. सध्याचे चित्र पाहता, प्रदीप पाटील चव्हाण हेच या बदलाचे केंद्रबिंदू ठरत असल्याचे दिसत आहे. आता प्रश्न एकच उरला आहे - प्रस्थापित आपली सत्ता टिकवून ठेवणार की जनता खऱ्या अर्थाने बदल घडवून आणणार? याचे उत्तर लवकरच मतपेटीतून स्पष्ट होईल.

जिल्हा परिषद - पंचायत समिती निवडणुका - २०२६

मतदार बंधू- भगिनींनो, आपलं

एक मत जिल्हा परिषद निवडणूक विभागासाठी (गट)

आणि

एक मत पंचायत समिती निर्वाचक गणासाठी (गण)

अवश्य द्या!

मतदान यंत्रावरील (बीयू) मतपत्रिकांचे रंग

जि. प. गटाची मतपत्रिका असेल पांढऱ्या रंगाची

पं. स. गणाची मतपत्रिका असेल गुलाबी रंगाची

(उमेदवारांची संख्या जास्त असल्यास आवश्यकते नुसार एकपेक्षा अधिक मतदान यंत्रांचा (बीयू) वापर करण्यात येतो)

मतदान दि. ०७ फेब्रुवारी २०२६ | वेळ - सकाळी ७:३० ते सायं. ५. ३०

मतदार यादीतील नाव शोधण्यासाठी 'मताधिकार' मोबाईल अ‍ॅप आणि https://mahasecvoterlist.in या संकेतस्थळाची सुविधा

राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र

MaharashtraSEC

कर मतदान... सांगतंय संविधान!

# मुस्लिम समाजाला शिवीगाळ व नेत्यांना जीवे मारण्याची धमकी; पाल येथील तरुणावर गुन्हा दाखल

**फुलंब्रीत खळबळ:**

**आत्ताच एक्सप्रेस**

**फुलंब्री (प्रतिनिधी)** समाजात जातीय द्वेष पसरवण्याच्या हेतूने मुस्लिम समाजाला जातीवाचक शिवीगाळ करणे आणि प्रमुख राजकीय नेत्यांना जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी फुलंब्री तालुक्यातील पाल येथील एका तरुणावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांनी आरोपीविरुद्ध कडक कलमान्वये कारवाई सुरू केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संजय उत्तम जाधव (रा. पाल, ता. फुलंब्री) याने आपल्या चारचाकी गाडीत बसून एक व्हिडिओ बनवला आणि तो सोशल मीडियावर व्हायरल केला. या व्हिडिओमध्ये त्याने अत्यंत चिथावणीखोर भाषेचा वापर करत मुस्लिम समाजाबद्दल आक्षेपार्ह आणि जातीवाचक शब्द वापरले.

केवळ शिवीगाळ करून न थांबता, जाधव याने राजकीय नेत्यांनाही लक्ष्य केले. यात प्रामुख्याने:

खासदार असदुद्दीन ओवैसी (अध्यक्ष, ),इम्तियाज जलील (माजी खासदार, छत्रपती संभाजीनगर),अब्दुल सत्तार (आमदार, सिल्लोड मतदारसंघ) या नेत्यांना संपवण्यासाठी आपण ७५ लाख रुपये घेऊ शकतो, असे खळबळजनक वक्तव्य त्याने व्हिडिओमध्ये केले आहे. सध्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांचे वारे वाहत असताना, अशा प्रकारे दोन




समाजांत तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

या प्रकरणी शेख अजीम शेख शकील (वय ३३, रा. फुलंब्री) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून फुलंब्री पोलीस ठाण्यात मंगळवार, ३ फेब्रुवारी २०२६ रोजी गुन्हा नोंदवण्यात आला आहे. आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ च्या खालील कलमांनुसार गुन्हा दाखल झाला आहे.

कलम ३०२: (जाणीवपूर्वक धार्मिक भावना दुखावणे/द्वेष पसरवणे) कलम ३५२: (शांतता भंग करण्याच्या हेतूने अपमान करणे) कलम ३५१: (गुन्हेगारी स्वरूपाची धमकी देणे) सदर घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस अधिकारी संभाजी वडते हे या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत. सोशल मीडियावर अशा प्रकारचे चिथावणीखोर व्हिडिओ पसरवू नयेत आणि शांतता राखावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## प्रामाणिकपणाचा आणि कतृत्वाचा सन्मान: कंधारच्या निर्मलाबाई कांबळे यांना 'माता रमाई गणगोत पुरस्कार' जाहीर

कंधार/लोहा (प्रतिनिधी): त्यागमूर्ती माता रमाई यांच्या जयंतीचे औचित्य साधून, माता रमाई विचारमंच आणि माता रमाई जयंती मंडळ (जवळा दे, ता. लोहा, जि. नांदेड) यांच्या वतीने दिला जाणारा मानाचा 'माता रमाई गणगोत पुरस्कार' यावर्षी कंधार येथील सामाजिक कार्यकर्त्या निर्मलाबाई त्र्यंबक कांबळे यांना जाहीर झाला आहे.



माता रमाई विचारमंचच्या वतीने दरवर्षी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ७ कर्तृत्ववान मातांना या पुरस्काराने गौरविण्यात येते. यंदाच्या पुरस्काराचे स्वरूप खालीलप्रमाणे आहे:

सन्मानपत्र व सन्मानचिन्ह,मानाचे पदक,शाल आणि पुष्पहार हा गौरव सोहळा शनिवार, दि. ७ फेब्रुवारी रोजी सकाळी ११:०० वाजता जवळा दे (ता. लोहा) येथे मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडणार आहे.

निर्मलाबाई कांबळे यांची निवड त्यांच्या सामाजिक जाणीवेसाठी आणि वैयक्तिक आयुष्यातील संघर्षासाठी करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमागे काही प्रमुख कारणे आहेत:

शिक्षणाप्रती ओढ: स्वतः शिक्षण घेण्याची संधी मिळालेली नसतानाही, निर्मलाबाईंनी शिक्षणाचे महत्त्व ओळखले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आपल्या पतीच्या आणि मुलांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहून त्यांनी मुलांना उच्चशिक्षित केले.

प्रामाणिकपणाचा आदर्श: काही काळापूर्वी निर्मलाबाईंना सुमारे ४८ हजार रुपये किमतीची सोन्याची अंगठी सापडली होती. गरिबीची परिस्थिती असतानाही कोणताही मोह न ठेवता त्यांनी ती अंगठी संबंधितांना प्रामाणिकपणे परत केली. त्यांच्या या प्रामाणिकपणाची समाजात मोठी चर्चा झाली होती.सामाजिक योगदान: ख्यातनाम पत्रकार राजेश्वर कांबळे यांच्या त्या मातोश्री असून, कौटुंबिक जबाबदाऱ्यांसोबतच त्यांनी सामाजिक कार्यातही नेहमीच पुढाकार घेतला आहे.एका सामान्य कुटुंबातील मातेने आपल्या संस्कारांतून आणि कष्टांतून जे आदर्श समाजासमोर ठेवले, त्याचा सन्मान 'माता रमाई गणगोत' पुरस्काराच्या रूपाने होत आहे. निर्मलाबाईंना हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल कंधार आणि लोहा परिसरातील सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# जितो लेडीज विंग तर्फे 'संक्रांती एलिट' कार्यक्रमाचे आयोजन; महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी**/येथील 'जितो लेडीज विंग' च्या वतीने मकर संक्रांतीच्या शुभमुहूर्तावर 'साई प्रसाद हॉल' येथे एका भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जितो लेडीज विंगच्या अध्यक्षा प्रिया मुथा, सचिव सोनल जैन, उपाध्यक्ष प्रिती बाकलीवाल आणि कोषाध्यक्ष प्रियंका संघवी यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा पार पडला.

सर्जनशीलता आणि मनोरंजनाचा संगम

या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे 'टेक अवे लर्निंग' अंतर्गत घेण्यात आलेले बोहो विथ थ्रेडस मॅक्रोमे (Macramμ) सत्र. या सत्राला उपस्थित सदस्यांनी प्रचंड प्रतिसाद दिला, ज्यातून महिलांच्या सर्जनशीलतेला वाव मिळाला.

विविध स्पर्धांची रेलचेल

कार्यक्रमात महिलांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते, ज्यात सहभागी महिलांनी मोठ्या उत्साहाने भाग घेतला.**उखाणा स्पर्धा:** पारंपारिक उखाण्यांच्या माध्यमातून महिलांनी आपली कला सादर केली.**वेशभूषा स्पर्धा:** उत्कृष्ट महाराष्ट्रीयन वेशभूषेने कार्यक्रमाची शोभा वाढवली.**गट खेळ:** मनोरंजक खेळांच्या माध्यमातून टीम वर्क आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रसिद्ध समाजसेविका रेखा राठी आणि रोबोटिक्स प्रीस्कुलच्या संचालिका कपिला करवा उपस्थित होत्या. कार्यक्रमात एकूण १०५ महिलांनी सक्रिय सहभाग नोंदवला.याप्रसंगी जितो अपेक्स युथचे पारस ओस्तवाल, अनिलकुमार संचेती, आशिष संकलेचा आणि नमित मुथियान यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच रोमचेअरपर्सन



डिंपल पगारीया, कनवेनर्स सपना मुथियान आणि सुरभी सचेती यांनीही उपस्थित राहून 'जितो लेडीज विंग'च्या या उपक्रमाचे आणि कला-सांस्कृतिक कार्याचे कौतुक केले.

आगामी संकल्प: 'आत्मनिर्भर कार्यशाळा'

जितो लेडीज विंग आणि सी.एस.एल. सातत्याने प्रगती करत असून येत्या काळात अनेक प्रेरणादायी आणि स्मरणीय कार्यक्रम आयोजित केले जातील, असा विश्वास अध्यक्षा प्रिया मुथा यांनी व्यक्त केला. तसेच, आगामी काळात महिलांसाठी 'आत्मनिर्भर कार्यशाळा' आयोजित करण्याची महत्त्वपूर्ण घोषणाही त्यांनी यावेळी केली.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जितो लेडीज विंगच्या सर्व सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.

## अखिल भारतीय आंतर-विद्यापीठ सॉफ्टबॉल स्पर्धा: डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा महिला संघ अमरावतीकडे रवाना

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी**/ ५ फेब्रुवारी २०२६ संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे आयोजित अखिल भारतीय आंतर-विद्यापीठ महिला सॉफ्टबॉल स्पर्धेत सहभागी होण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा महिला संघ आज उत्साहात रवाना झाला. ही स्पर्धा ५ ते १० फेब्रुवारी २०२६ या कालावधीत पार पडणार आहे.स्पर्धेत सर्वोत्तम कामगिरी करण्यासाठी संघाचे विशेष सराव प्रशिक्षण शिबिर १ ते ५ फेब्रुवारी दरम्यान देवगिरी महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन प्राचार्य रवी पाटील, उपप्राचार्य अपर्णा तावडे, क्रीडा संचालक डॉ. सचिन देशमुख आणि डॉ. शेखर सिरसाठ यांच्या उपस्थितीत झाले.

शिबिराचा समारोप विभागीय क्रीडा संकुल, गारखेडा येथे क्रीडा उपसंचालक शेखर पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आला. यावेळी त्यांनी खेळाडूंना स्पर्धेसाठी मोलाचे मार्गदर्शन व शुभेच्छा दिल्या.

संघाला रवाना करताना विद्यापीठाचे प्रभारी क्रीडा संचालक डॉ. सचिन देशमुख, जिल्हा सॉफ्टबॉल संघटनेचे सचिव गोकुळ तांदळे, डॉ. मसूद हाश्मी, मोहन लहीलवार, गणेश कड आणि NIS प्रशिक्षक अमृता शेळके यांनी खेळाडूंचे मनोबल वाढवले.

तसेच विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. विजय फुलारी, कुलसचिव प्रा. डॉ. प्रशांत अमृतकर, जिल्हा



सॉफ्टबॉल संघटनेचे अध्यक्ष डॉ. दत्ताभाऊ पाथ्रीकर, उपाध्यक्ष डॉ. फुलचंद सलामपुरे यांच्यासह प्रशिक्षक सुरेंद्र मोदी, किरण शुरकांबळे, अभिजितसिंग दिक्कत आणि डॉ. रामेश्वर विधाते यांनी संघास विजयासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

निवड झालेला महिला संघ पुढीलप्रमाणे:विद्यापीठाच्या या १५ सदस्यीय संघात प्रतिभावान खेळाडूंचा समावेश आहे. खेळाडू: नंदिनी आसलकर, मयुरी चव्हाण, ईश्वरी शिंदे, अंजली विश्वकर्मा, वैष्णवी कटारे, लक्ष्मी चांगुलपाये, साक्षी दांडगे, मोना दांडगे, गीतांजली जगताप, अंजली जाधव, वैष्णवी राठोड, गौरी उधे, कल्याणी डुकरे, सलोनी जावळे, प्रियंका गौंड.

प्रशिक्षक: संतोष आवचार, गणेश बेटूदे,व्यवस्थापक: अमृता शेळके मराठवाड्याच्या या रणरागिणी अमरावतीच्या मैदानात आपली चमक दाखवण्यासाठी सज्ज झाल्या असून, संपूर्ण विद्यापीठ वर्तुळातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## मौन बाळगणे हा गुन्हाच!; न्यायमूर्ती महेश सोनक यांचे वकिलांना निर्भीड राहण्याचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी**/ न्यायव्यवस्थेच्या हितासाठी जेव्हा बोलणे आवश्यक असते, तेव्हा गप्प बसणे हा द्रोहासारखा आहे, अशा परखड शब्दांत न्यायमूर्ती महेश सोनक यांनी वकील वर्गाला त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून दिली. मुंबई उच्च न्यायालयातून पदोन्नतीने झारखंड उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती म्हणून पदभार स्वीकारण्यापूर्वी आयोजित निरोप समारंभात ते बोलत होते.

१. बार हाच न्यायाधीशांचा 'न्यायाधीश'

खचाखच भरलेल्या सेंट्रल कोर्ट हॉलमध्ये न्यायमूर्ती सोनक यांनी बार (वकील संघटना) आणि बेंच (न्यायाधीश) यांच्यातील नात्यावर भाष्य केले. ते म्हणाले की, जशी एखादी नदी तिच्या उगमापेक्षा उंच जाऊ शकत नाही, तसेच कोणताही न्यायाधीश त्याला घडवणाऱ्या बारपेक्षा श्रेष्ठ असू शकत नाही. वकील वर्ग हा नेहमीच न्यायाधीशांचा 'न्यायाधीश' असतो आणि राहिल.

**२. चुकणाऱ्या न्यायाधीशांना सुधारणे ही वकिलांची जबाबदारी**

न्यायमूर्तींनी अत्यंत प्रामाणिकपणे नमूद केले की, न्यायाधीश म्हणून आम्ही केवळ आमचे कर्तव्य बजावतो, त्यासाठी विशेष कौतुकाची गरज नाही. मात्र, जर एखादा न्यायाधीश नीतिमत्तेच्या मार्गावरून भरकटत असेल, तर त्याला वेळेवर सुधारणे ही एका सक्षम बारची जबाबदारी आहे. संस्थेला शत्रूंच्या शिव्यांचा विसर पडेल, पण तिच्या रक्षकांनी (वकिलांनी) धरलेल्या मौनाला संस्था कधीच माफ करणार नाही.

**३. तांत्रिकतेपेक्षा 'मानवी चेहरा' महत्त्वाचा**

न्यायदानाच्या प्रक्रियेबद्दल बोलताना त्यांनी संवेदनशील दृष्टिकोन मांडला. त्यांच्या मते न्याय देणे म्हणजे केवळ कोणत्या बाजूचा वकील प्रभावी आहे हे ठरवणे नव्हे.प्रत्येक फाईलच्या मागे एक 'मानवी चेहरा' असतो, जो न्यायासाठी आक्रोश करत असतो. त्या चेहऱ्याला न्याय देणे हे न्यायाधीशांचे पवित्र कर्तव्य आहे.जर न्याय महागडा, तांत्रिक किंवा उशिरा मिळत असेल, तर कायदेशीर ज्ञानाचा कोणताही वारसा उपयोगाचा नाही.

४. अधीरता आणि कठोरता: न्यायाधीशांचे 'काळे डाग'न्यायमूर्ती सोनक यांनी न्यायाधीशांच्या वर्तणुकीवरही भाष्य केले. अधीरता आणि कठोरता हे गुण न्यायाधीशांच्या प्रतिमेला काळिमा फासणारे आहेत. हे दुर्गुण खंडपीठावर येणे न्यायव्यवस्थेसाठी घातक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

५. कायदेतज्ज्ञांकडून स्वागत

नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ड. महेश एस. धनावत यांनी न्यायमूर्तींच्या या भूमिकेचे स्वागत केले. ते म्हणाले की, न्यायमूर्ती सोनक यांचे विचार तरुण वकिलांसाठी आणि विधी विद्यार्थ्यांसाठी 'दीपस्तंभा'सारखे आहेत. न्यायव्यवस्थेचे स्वातंत्र्य टिकवण्यासाठी बारने निर्भीडपणे रक्षक म्हणून भूमिका बजावली पाहिजे, हा संदेश अत्यंत मोलाचा आहे.न्यायमूर्ती सोनक यांनी आपल्या भाषणातून हे स्पष्ट केले की, न्यायव्यवस्था केवळ इमारती किंवा कायद्याच्या पुस्तकांवर चालत नाही, ती सत्याचा आवाज उठवणाऱ्या निर्भीड वकील आणि संवेदनशील न्यायाधीशांच्या सामूहिक संकल्पावर टिकून आहे.

# शेतकऱ्यांच्या सुविधेसाठी 'बळीराजा पाणंद रस्ते' योजना प्रभावीपणे राबवा-आमदार हिकमत दादा उढाण

**आत्ताच एक्सप्रेस**

**अंबड /प्रतिनिधी/** शेतकऱ्यांना त्यांच्या शेतापर्यंत बाराही महिने सुखकर प्रवास करता यावा आणि शेतीमालाची वाहतूक सुलभ व्हावी, यासाठी राज्य शासनाने 'मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना' हाती घेतली आहे. या योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी अंबड तहसील कार्यालयात एक महत्त्वाची बैठक पार पडली. घनसावंगी विधानसभा मतदारसंघाचे आमदार हिकमत दादा उढाण यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक संपन्न झाली.




बैठकीत आमदार उढाण यांनी अंबड आणि घनसावंगी तालुक्यातील सुरू असलेल्या व प्रस्तावित कामांचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी त्यांनी स्पष्ट शब्दात बजावले की, शेतकऱ्यांच्या हक्काचे रस्ते हे दर्जेदार आणि मजबूत असायला हवेत. कामाच्या गुणवत्तेत कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही. निकृष्ट दर्जाची कामे करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल.

काही ठिकाणी कामांची गती मंद असल्याबाबत आमदारांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. त्यांनी प्रशासनाला खालील निर्देश दिले आहेत.सर्व प्रलंबित कामे नियोजित वेळेत पूर्ण करावीत जेणेकरून पावसाळ्यापूर्वी शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळेल.अधिकाऱ्यांनी केवळ कागदावर अहवाल न देता प्रत्यक्ष स्थळावर जाऊन कामांची पाहणी करावी.रस्ते कामात स्थानिक शेतकऱ्यांना कोणताही त्रास होणार नाही, याची विशेष दक्षता घ्यावी.

बैठकी दरम्यान उपस्थित तहसीलदार आणि गटविकास अधिकाऱ्यांनी योजनेच्या सद्यस्थितीचे सादरीकरण केले. यामध्ये आतापर्यंत पूर्ण झालेली कामे, उपलब्ध निधी आणि कामात येणाऱ्या तांत्रिक व स्थानिक अडचणींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या समस्यांचे निवारण करून कामांना गती देण्याचे आश्वासन अधिकाऱ्यांनी दिले.

या महत्त्वपूर्ण आढावा बैठकीस उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी, अंबडचे तहसीलदार विजय चव्हाण, घनसावंगीचे तहसीलदार रमेश पागोटे, संबंधित पंचायत समितीचे गटविकास अधिकारी आणि विविध विभागांचे अभियंता व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना ही ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा ठरणार आहे. शेतकऱ्यांच्या दळणवळणाचा प्रश्न सुटल्यास शेती विकास वेगाने होईल, त्यामुळे प्रशासनाने ही कामे आपली जबाबदारी समजून पूर्ण करावीत.

**- आमदार हिकमत दादा उढाण**

# जालना जिल्ह्यातील दलित-आदिवासी समाज शिवसेनेच्या पाठीशी खंबीरपणे उभा; ॲड. भास्कर मगरे यांचा निर्धार

आत्ताच एक्सप्रेस

जाफराबाद (प्रतिनिधी) जालना जिल्ह्यात दलित आणि आदिवासी समाजाच्या ज्वलंत प्रश्नांवर शिवसेना दलित आघाडीने सातत्याने रस्त्यावरचा संघर्ष केला आहे. या लढ्यामुळे अनेक प्रश्न सुटले असले तरी, प्रलंबित मागण्यांसाठी आंदोलनाची भूमिका कायम आहे. आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत जिल्ह्यातील उपेक्षित समाज शिवसेनेच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील, असा ठाम विश्वास शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख ॲड. भास्करराव मगरे यांनी व्यक्त केला.

जाफराबाद येथे ५ जानेवारी २०२६ रोजी शिवसेना, युवासेना आणि दलित आघाडीच्या वतीने आयोजित मेळाव्यात ते बोलत होते.७/१२ वरील 'पोट खराबी' दुरुस्त करण्याची मागणी.

मेळाव्यात बोलताना ॲड. मगरे यांनी जमिनीच्या तांत्रिक प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधले. ते म्हणाले की,२०१५-१६ मध्ये संगणकीय ७/१२ प्रणालीमध्ये तांत्रिक बदलांमुळे दलित-आदिवासी लाभार्थ्यांच्या जमिनी (गायरान, इनामी आणि सीलिंग) 'पोट खराबी' क्षेत्रात दाखवण्यात आल्या आहेत.यामुळे शेतकरी शासकीय मदत आणि बँकेच्या कर्जापासून वंचित राहत आहेत. ही चूक तातडीने सुधारून ७/१२ वरील क्षेत्र पूर्ववत करण्याची मागणी त्यांनी केली.घरकुल आणि जमीन वाटप योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीवर भर

उपेक्षित समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी मगरे यांनी खालील प्रमुख मागण्या मांडल्या:जमीन वाटप: कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमानी योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना ४ एकर जिरायती किंवा २ एकर बागायती जमिनीचे वाटप तातडीने करावे.घरकुल योजना: रमाई, शबरी, इंदिरा आवास आणि प्रधानमंत्री आवास योजनेतून २०२४ पर्यंतच्या उद्दिष्टांची पूर्तता करून वंचितांना हक्काची घरे मिळावीत.मानधनात वाढ: निराधार योजनेतील मासिक अनुदान १,५०० रुपयांवरून वाढवून ३,००० रुपये करावे आणि ते दरमहा नियमित मिळावे.

शिवसेना दलित आघाडीने राबवलेल्या 'शिव संपर्क अभियाना'ची माहिती देताना मगरे यांनी सांगितले की, हे अभियान जिल्ह्यातील गाव-वाडी आणि तांडा-वस्तीपर्यंत पोहोचले आहे.

# जालना जिल्ह्यात १० वी व १२ वीच्या परीक्षांसाठी 'कडक वॉच'; कॉपी केल्यास थेट फौजदारी गुन्हे दाखल होणार

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या इयत्ता १० वी आणि १२ वीच्या परीक्षा पारदर्शक आणि कॉपीमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी जालना जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे. शिक्षण ही राष्ट्रनिर्मितीची पायाभूत शक्ती आहे, हे ब्रीद वाक्य समोर ठेवून जिल्हादंडाधिकारी आशिमा मित्तल यांनी जिल्ह्यात कडक निर्बंध लागू केले आहेत.

महत्त्वाचे तपशील आणि वेळापत्रकजालना जिल्ह्यात १०२ केंद्रांवर १० वीची, तर ७९ केंद्रांवर १२ वीची परीक्षा होणार आहे.

कालावधी: १० फेब्रुवारी २०२६ ते १८ मार्च २०२६. कलम १६३ लागू.परीक्षा केंद्रांच्या परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (जमावबंदी) लागू करण्यात आले आहे.ड्रोन आणि सीसीटीव्हीची 'डिजिटल' नजरयावर्षी प्रशासनाने तांत्रिक देखरेखीवर विशेष भर दिला आहे.

सीसीटीव्ही: प्रत्येक परीक्षा केंद्रातील प्रत्येक हॉलमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत.

ड्रोन टेहळणी: केंद्राच्या परिसरातील हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी प्रथमच ड्रोनचा वापर करण्यात येणार आहे. पथके: गैरप्रकार रोखण्यासाठी जिल्हास्तरावर 'भरारी पथके' आणि प्रत्येक केंद्रावर 'बैठे पथके' तैनात करण्यात आली आहेत.

कडक कायदेशीर कारवाईचे संकेतपरीक्षेदरम्यान कोणताही गैरप्रकार आढळल्यास सवलत दिली जाणार नाही. खालील बाबींवर कठोर कारवाई केली जाईल:

गैरप्रकार: कॉपी करणे, मोबाईल फोनचा वापर, बनावट ओळखपत्र किंवा प्रश्नपत्रिका फोडण्याचा प्रयत्न.दोषींवर कारवाई: परीक्षार्थी, पालक, बाह्य व्यक्ती किंवा कर्मचारी दोषी आढळल्यास 'महाराष्ट्र सार्वजनिक परीक्षा अधिनियम १९८२' आणि 'भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३' च्या कलम १२६ अन्वये थेट गुन्हे दाखल करण्यात येतील.

विद्यार्थ्यांनी कोणत्याही अफवांना किंवा आमिषांना बळी पडू नये. प्रामाणिकपणे अभ्यास करून परीक्षा द्यावी. परीक्षेतील पारदर्शकता टिकवण्यासाठी पालक आणि नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे.

-आशिमा मित्तल, जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा दक्षता समिती, जालना.

प्रशासनाची तयारी एका नजरेतघटकमाहिती १० वी परीक्षा केंद्र१०२१२ वी परीक्षा केंद्र ७९ सुरक्षा यंत्रणापोलीस दल, शिक्षण विभाग व भरारी पथके तंत्रज्ञानसीसीटीव्ही आणि ड्रोन कॅमेरेप्रतिबंधात्मक आदेशकलम १६३ (जमावबंदी) आहे.

# लोकनेते सुभाष निकम सर: सात्विक विचारांचा आणि धडाडीच्या कर्तृत्वाचा एक 'रायझिंग स्टार'!

समाजकारणाचे बाळकडू रक्तात असावे लागते आणि जनसेवेची जिद्द मनगटात! याच गुणांचा संगम म्हणजे आदरणीय सुभाष निकम सर. नादरपूरच्या मातीतून उमललेले हे व्यक्तिमत्व आज केवळ एका शिक्षण संस्थेचे चालक नाहीत, तर दीन-दलितांचे आधारवड आणि सामाजिक परिवर्तनाचे अग्रदूत बनले आहेत. त्यांच्या संघर्षाची आणि यशाची गाथा ही आजच्या तरुणाईसाठी प्रेरणादायी मशाल आहे.



**१.आध्यात्मिक अधिष्ठान आणि संघर्षातून उदय**

५ फेब्रुवारी १९... रोजी नादरपूर (ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर) येथे निकम सरांचा जन्म झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळेत झाले. मात्र, त्यांचे वेगळेपण तिथेच सिद्ध झाले, जेव्हा त्यांनी माध्यमिक शिक्षणानंतर ऐन तारुण्यात सर्व भौतिक सुखांचा त्याग करून पुणे येथील जाधुवाडी येथे दोन वर्षे आध्यात्मिक शिक्षण घेतले. हीच ती वेळ होती जेव्हा त्यांच्यावर परोपकाराचे आणि सात्विकतेचे संस्कार झाले.

**२.सहकार आणि शिक्षण क्षेत्रातील क्रांती**

पुण्याहून परतल्यानंतर त्यांनी केवळ स्वतःच्या शेतीवर लक्ष दिले नाही, तर गावकऱ्यांच्या रोजगाराचा प्रश्न मिटवण्यासाठी दुध संघाची स्थापना केली. तिथून सुरू झालेला हा प्रवास सहकार आणि शिक्षण क्षेत्रात मैलाचा दगड ठरला.

**शिक्षण प्रसार:** 'स्व. तेजराव पाटील बहुउद्देशीय शिक्षण संस्थे'च्या माध्यमातून त्यांनी 'रायझिंग स्टार' शाळांची मालिकाच उभी केली. मयूर पार्क (संभाजीनगर), चिकलठाण अशा ग्रामीण व निमशहरी भागात दर्जेदार शिक्षणाची गंगा पोहोचवली.

**सहकार आणि वित्त:** 'हिंदुतेज निधी अर्बन बँक' आणि 'हिराजी बाबा सहकारी साखर कारखाना' यांसारख्या संस्थांच्या माध्यमातून त्यांनी आर्थिक आणि औद्योगिक क्रांतीत मोठे योगदान दिले.

**३. राजकारणातील निर्भीड नेतृत्व**

सुभाष निकम सर हे केवळ स्वप्न पाहणारे नाहीत, तर ती सत्यात उतरवणारे लढवय्ये आहेत. त्यांनी विविध राजकीय पक्षांमध्ये महत्त्वाची पदे भूषवली आहेत. कन्नडमध्ये काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी संघटना बांधणी केली.

आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष म्हणून जनसामान्यांचे प्रश्न मांडले.

सध्या ते शिवसेना (शिंदे गट) मध्ये सक्रिय असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली लोकसेवेचे कार्य करत आहेत.

**४. सामाजिक बांधीलकी आणि क्रांतीकारक पावले**

निकम सरांच्या कार्याचा सर्वात तेजस्वी पैलू म्हणजे त्यांची सामाजिक संवेदनशीलता:

**अनाथांचा आधार:** ज्या विद्यार्थ्यांच्या वडिलांचे निधन झाले आहे, अशा मुलांना ते मोफत शिक्षण देतात.

**महिला सन्मान:** जागतिक महिला दिनानिमित्त हळदी-कुंकू कार्यक्रमात विधवा महिलांचा सन्मान करून त्यांनी जुनाट सामाजिक प्रथांना छेद दिला आहे.

मराठा आरक्षण: मराठा आरक्षणाच्या लढ्यात त्यांनी मनोज जरांगे पाटील यांच्या खांद्याला खांदा लावून सक्रिय सहभाग नोंदवला आहे.

**५. गौरव आणि पुरस्कार**

त्यांच्या या अतुलनीय कार्याची दखल घेत त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे:

गुण गौरव पुरस्कार

म. फुले समता दूत पुरस्कार

छत्रपती शिवाजी महाराजांचे दुसरे मंदिर असलेल्या जळकी बाजार येथील विशेष शैक्षणिक पुरस्कार.

सुभाष निकम सर म्हणजे एक असे नेतृत्व आहे जे जमिनीवर राहून आकाशाला गवसणी घालण्याचे सामर्थ्य ठेवते.

गरिबांच्या मुलांच्या डोळ्यात शिक्षणाचे स्वप्न फुलवणे आणि त्यांच्या आयुष्यातील अंधार दूर करणे हेच त्यांच्या जीवनाचे अंतिम ध्येय आहे. त्यांच्या या झंझावाती कार्याला समस्त महाराष्ट्राचा मानाचा मुजरा!

**- सुग्रीव मुंडे,**
**संपादक,नौकरी एक्सप्रेस**

## तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

### जाहीर प्रगटन

अर्जदार श्रीमान / श्रीमती शिवकन्या वैजीनाथ खराद, रा. डोमलगाव ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वतःच्या जन्म नोंदणीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबंधित निबंधकांनी त्यांच्या जन्म नोंदणीच्या अनुपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे. त्यांची जन्मतारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १. | शिवकन्या वैजीनाथ खराद | स्वतः | ०२/०६/१९८० |

निबंधकांनी दिलेल्या जन्म नोंदणीच्या अनुपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायानुसार सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध करण्यात यावे.

तसेच या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमूद अर्जदार यांच्या जन्म नोंदणीबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही, तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २४/१०/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी जाहीर प्रगटन दिले आहे.

**सही /-**
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी,**
**अंबड**

## जालना हादरले!

# आरोही बिडलान मृत्यू प्रकरण: शाळेच्या निष्काळजीपणावर राहुल करनाडे आक्रमक, जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रारीचा 'विस्फोट'

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/गणेश सपकाळ/** जालना शहरातील उढचघ गुजराती शाळेत १३ वर्षीय विद्यार्थिनी आरोही दिपक बिडलान हिच्या झालेल्या संशयास्पद मृत्यू प्रकरणाने आता मोठे वळण घेतले आहे. या घटनेला दोन महिने उलटूनही अद्याप ठोस कारवाई न झाल्याने, सामाजिक कार्यकर्ते राहुल सत्यनारायणजी करनाडे यांनी आज थेट जिल्हाधिकारी कार्यालय गाठले. आरोहीचा मृत्यू की हत्या? असा संतप्त सवाल उपस्थित करत त्यांनी या प्रकरणाच्या स्वतंत्र चौकशीची मागणी केली असून, प्रशासनाला गंभीर इशारा दिला आहे.

२१ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ७:३० ते ८:०० वाजेच्या दरम्यान, उढचघ गुजराती शाळेच्या तिसऱ्या मजल्यावरून पडून इयत्ता ८ वी मध्ये शिकणाऱ्या आरोही बिडलानचा मृत्यू झाला होता. ही घटना निव्वळ अपघात नसून शाळेच्या अक्षम्य निष्काळजीपणाचा आणि मानसिक छळाचा परिणाम असल्याचा गंभीर आरोप आता समोर येत आहे.

राहुल करनाडे यांनी उपस्थित केलेले जळजळीत प्रश्न:

तक्रार अर्जात राहुल करनाडे यांनी शाळेच्या सुरक्षेवर आणि प्रशासनावर अनेक गंभीर ताशेरे ओढले आहेत.सुरक्षा वाऱ्यावर: तिसऱ्या मजल्यावरील गॅलरीची भिंत केवळ १ फूट उंचीची आहे. तिथे कोणत्याही प्रकारची संरक्षक जाळी किंवा ग्रिल का नव्हती? हा विद्यार्थ्यांच्या जिवाशी खेळ नाही का?शिक्षकांचा जाच? मृत आरोहीच्या वडिलांनी शिक्षकांकडून होणारा मानसिक छळ आणि 'बुलिंग'चे आरोप केले आहेत. शाळेत शिकायला जाणाऱ्या मुलीवर आत्महत्येची वेळ येतेच कशी? **संविधानाचा पायदळी तुडवा:** अनुच्छेद २१ (जीवनाचा अधिकार) आणि ठढए कायद्यानुसार सुरक्षित वातावरण देण्याची जबाबदारी शाळेची आहे. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर भा.द.वि. कलम ३०६ अंतर्गत कारवाई का होऊ नये?

प्रशासनासमोर मांडलेल्या प्रमुख मागण्या:




राहुल करनाडे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे खालील मागण्यांचा पाढा वाचला आहे.स्वतंत्र चौकशी समिती: CWC, मानसोपचारतज्ज्ञ आणि पोलीस प्रशासनाची उच्चस्तरीय समिती नेमून तात्काळ चौकशी व्हावी.

दोषींवर कठोर कारवाई: सुरक्षेच्या त्रुटींसाठी जबाबदार असणाऱ्या शाळा व्यवस्थापनावर गुन्हे दाखल व्हावेत.**कुटुंबाला न्याय:** मृत आरोहीच्या कुटुंबाला ५ ते १० लाख रुपयांची आर्थिक मदत आणि कुटुंबातील एका सदस्याला दयाळू तत्त्वावर नोकरी मिळावी.**सुरक्षा ऑडिट:** जिल्ह्यातील सर्व शाळांचे 'सेफ्टी ऑडिट' करून मानसिक आरोग्य कक्ष सक्तीचे करावेत.यावेळी विजय ओमप्रकाश भगत यांचीही उपस्थिती होती. आता या तक्रारीनंतर जिल्हा प्रशासन आणि पोलीस प्रशासन उढचघ गुजराती शाळेवर काय कारवाई करते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

> आरोहीचा मृत्यू ही केवळ एक दुर्घटना नाही, तर व्यवस्थेने केलेला बळी आहे. जर प्रशासनाने यावर तात्काळ कठोर पावले उचलली नाहीत, तर आम्ही गप्प बसणार नाही. या अन्यायाविरुद्ध आम्ही थेट उच्च न्यायालयात जनहित याचिका (झखङ) दाखल करू!
>
> **- राहुल सत्यनारायणजी करनाडे**
> **(सामाजिक कार्यकर्ते)**

# जालना जिल्ह्यातील युवकांसाठी सुवर्णसंधी: 'बजेट क्वेस्ट २०२६' राष्ट्रीय स्पर्धेचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/** केंद्रीय अर्थसंकल्पाची माहिती युवकांपर्यंत पोहोचावी आणि त्यांना देशाच्या अर्थनीतीशी जोडता यावे, या उद्देशाने 'मेरा युवा भारत' (MY Bharat) संस्थेतर्फे 'बजेट क्वेस्ट २०२६' या भव्य राष्ट्रीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ३ ते १७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत ही स्पर्धा ऑनलाईन पद्धतीने पार पडणार असून, जालना जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवकांनी यात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा युवा अधिकारी यांनी केले आहे.

**थेट पंतप्रधानांशी संवाद साधण्याची मिळणार संधी**

स्पर्धेचे स्वरूप आणि टप्पे

ही स्पर्धा प्रामुख्याने दोन महत्त्वाच्या टप्प्यांमध्ये विभागली गेली आहे:

१.पहिला टप्पा (ऑनलाइन क्विझ): यामध्ये केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ मधील विविध तरतुदी आणि मूलभूत बाबींवर आधारित प्रश्नांची उत्तरे द्यावी लागतील.

२.दुसरा टप्पा (निबंध स्पर्धा): क्विझमध्ये यशस्वी होणाऱ्या उमेदवारांना निबंध स्पर्धेत सहभागी होता येईल. या टप्प्यातील विजेत्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी व्हर्च्युअल माध्यमातून संवाद साधण्याची ऐतिहासिक संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे.

सहभागासाठी पात्रता आणि नोंदणी

ही स्पर्धा देशभरातील सर्व युवकांसाठी खुली आहे.

सहभागी होण्यासाठी उमेदवाराने 'मेरा युवा भारत'च्या अधिकृत पोर्टलवर (https://mybharat.gov.in(https://mybharat.gov.in) नोंदणी करणे अनिवार्य आहे.जालना जिल्ह्यातील ज्या युवकांनी अद्याप नोंदणी केलेली नाही, त्यांनी त्वरित पोर्टलवर जाऊन आपले नाव नोंदवावे.

**विकसित भारताच्या दिशेने**




**महत्त्वाचे पाऊल**

या उपक्रमाचे उद्घाटन केंद्रीय युवक कार्यक्रम व क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडवीया यांच्या हस्ते करण्यात आले आहे. युवकांचे विचार राष्ट्रीय व्यासपीठावर मांडणे आणि 'नागरिक केंद्रित बजेट' संकल्पनेला बळकटी देणे हा या स्पर्धेचा मुख्य हेतू आहे. विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी युवकांचा अर्थव्यवस्थेतील सहभाग अत्यंत मोलाचा ठरणार आहे. जालना जिल्ह्यातील तरुण-तरुणींनी आपली बुद्धिमत्ता आणि अर्थविषयक समज सिद्ध करण्यासाठी या स्पर्धेत मोठ्या संख्येने नोंदणी करावी. आपल्या कल्पना थेट राष्ट्रीय स्तरावर पोहोचवण्याची ही एक उत्तम संधी आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अँण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813